**जाहीरात क्रमांक ०१ /२०२१ जिल्हा परिषद,सोलापूर**

**आरोग्य विभाग**

**सिध्देश्वर पेठ सोलापूर**

**फोन ०२१७-२७२६५७८ ईमेल आयडी न .dhosolapur@gmail.com**

**विवरणपत्र - अ**

**( ग्रामविकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण /२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८/ दिनांक २०/०८/२०२१ चे सहपत्र )**

---

## जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरतीबाबत जाहीर प्रकटन

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट-क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च, २०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परिक्षा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. दरम्यान कोविड-१९ साथ रोगाच्या पार्श्वभुमीवर तसेच इतर साथ रोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधीत आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गातील माहे मार्च,२०१९ मध्ये दिलेल्या जाहीरातीमधील नमुद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर जाहिरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ | पदाचे नांव | एकूण रिक्त पदे | खेळाडू (५%) | प्रकल्प ग्रस्त (५%) | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|
| १<br>१ | आरोग्य सेवक पुरूष ५०% हंगामी फवारणी कर्मचारी | ९० | १ | १ | एकूण -४ पदे<br>१. LV { Low Vision} -१ ,२. D,HH {Deaf / Hard of Hearing} - १,३.OL { One Leg} / Cp {Cerebral Palsy } / LP {Leprosy Cured} / D {Dwarfism} / AAV{Acid Attack Victims}-१<br>४.SLD{Specific Learning}/ MI{Mentin Ilness}-<br>५.MD Involving LV/D,HH/OL /CP/LC/DwAAVSLD MI u<br>अ.क्र. ४ व ५ प्रवर्गासाठी ०१ |

| अ क्र | पदाचे नांव | एकूण रिक्त पदे | दिव्यांग |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य सेवक पुरूष ४०% | ०७ | १. LV { Low Vision} - १ |

| अ क्र | पदाचे नांव | एकूण रिक्त पदे | दिव्यांग |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य सेविका (महिला ) | २३७ | एकूण ०९<br>पदे १. LV { Low Vision} ३ , २. D,HH {Deaf / Hard of Hearing} - २ ,३.OL { One Leg} / Cp , {Cerebral Palsy } / LP, {Leprosy Cured} / D,{Dwarfism} / AAV {Acid Attack Victims}-२ , ४.SLD{Specific Learning}/ MI{Mentin Ilness}- ५.MD Involving LV/D,HH/OL/CP/LC/DwAAVSLD MI u<br>अ.क्र. ४ व ५ साठी दोन पदे |

एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापि, ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने आर्थिकदृष्टया मागास (ESW) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे, त्याने परिक्षेपूर्वी सक्षम अधिका-यांचे आर्थिकदृष्टया मागास (SEW) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परिक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (ESW) प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

४) जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत. तथापि, खुल्या प्रवर्गातील वयोमर्यादेकरिता पात्र आहेत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून गणण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागु असलेले परिक्षा शुल्क (यापूर्वी एसईबीसी प्रवर्गातून अदा केलेली रक्कम वगळता उर्वरीत रक्कम) परिक्षेपूर्वी अदा करणे आवश्यक राहील. सदर उमेदवारांनी **दिनांक.०१ सप्टेंबर,२०२१ ते १४ सप्टेंबर,२०२१ या** कालावधीत वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावरुन शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरुन शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

५) माहे मार्च,२०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रदद झ ाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही **OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने** राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्या सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परीक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत. अशा उमेदवारांनी परिक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दिनांक.०१ सप्टेंबर,२०२१ ते १४ सप्टेंबर,२०२१ या** कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल.

तसेच, अनुकंपा नियुक्ती व इतर कारणामुळे माहे मार्च २०१९ च्या जाहीरातीतील कांही प्रवर्ग रद्द झाले आहेत. (सदर प्रवर्गाबाबतची माहिती जिल्हा परिषदेने नमुद करावी.) सदर प्रवर्गातंर्गत माहे मार्च २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांने संबधित प्रवर्गातून वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक ०१/०९/२०२१ ते १४/०९/२०२१ या कालावधीत इतर जिल्हा परिषदेच्या विकल्प नोंदविणे आवश्यक राहिल.

६) नव्याने समाविष्ठ झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर या पूर्वी माहे मार्च,२०१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार खुला अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगांच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगांकरिता नव्याने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

७) यापूर्वी उमेदवारांकडून लेखी परीक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परीक्षा केंद्रामधून परीक्षा देणार आहे, त्या परीक्षा केंद्राबाबत प्राथम्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राधान्यक्रमानुसार उमेदवारास संबंधित जिल्हयातून परिक्षेस बसण्याबाबत प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.

८) माहे मार्च,२०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता एका पदाकरिता एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सर्व ठिकाणी परीक्षा शुल्क भरलेले आहे. तथापि, उमेदवारांना एकाच ठिकाणी परीक्षा देता येणार असल्याने संबधित उमेदवारांनी भरलेले अधिकचे

केंद्र शासनाच्या दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगाच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गाकरीता तसेच सामाजिक व आर्थिक दृष्टया (एसइबीसी ) मागासप्रवर्ग रद्द झाल्याने, खुल्या प्रवर्गातील नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाकरीता अर्ज करण्याची पध्दत.

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत परिक्षे करीता फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील |
| २ | www.maharddzp.com या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहे. |
| ०३ | सर्व पदाकारीता ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा दिनांक -०१ सप्टे २०२१ |
| ०४ | सर्व पदाकरीता ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक २१ सप्टे २०२१ |
| ०५ | आरोग्य विभागाकडील वर नमुद करीता उमेदवारासाठी निश्चित करावयाचे निकष (शुल्क,वयोमर्यादा,शैक्षणिक पात्रता व इतर बाबी जिल्हा परिषद सोलापूर अतंर्गत गट क मधील सरळ सेवेची रिक्त पदे , ऑन लाईन पध्दतीने भरण्यासाठीची जाहीरात क्रमांक ०१/२०१९ दिनांक ०३/०३/२०१९ अन्वये प्रसिध्द केलेल्या जाहीरात नुसार राहील. सदरची जाहीरात व वरील दिव्यांगाच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गा करीता तसेच सामाजिक व आर्थिक दृष्टया ( एसइबीसी ) मागासप्रवर्ग रद्द झाल्याने , खुल्या प्रवर्गातील नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाकरीता सुधारीत पदे भरणे बाबतची जाहीरात व भरतीच्या अनुषंगाने द्यावयाचे जाहीर प्रकटन जिल्हा परिषद,सोलापूरच्या .zpsolapur.gov.in व www.maharddzp.com या संकेत स्थळावर उपलब्ध्द आहे. |

२ www.maharddzp.com या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहे.

**माहे मार्च,२०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरिता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.**

माहे मार्च,२०१९ मधील जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरिता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन Login ID Password create करणे आवश्यक आहे.

१) माहे मार्च,२०१९ मध्ये आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गाकरिता आवेदनपत्र / अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबंधित प्रवर्गातून परीक्षेकरिता पात्र राहतील.

२) माहे मार्च, २०१९ मध्ये अरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गाकरिता आवेदनपत्र / अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबंधित प्रवर्गातून परीक्षेकरिता पात्र राहतील.

३) मा. सर्वोच्च न्यायालयाने विषेश अनुज्ञा याचिका क्र. १५७३७/२०१९ व इतर याचिकामध्ये शासकीय नोक-यांमधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थीक दृष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक २३ डिसेंबर, २०२० च्या शासननिर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गातून (ESW) आराक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवाराने आर्थिक दृष्टया दुर्बल प्रवर्गाबाबत (ESW) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दिनांक.०१ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१ या** कालावधीत विकल्प द्यावेत. उमेदवाराने

परीक्षा शुल्क प्राप्त करुन घेण्यातसाठी वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर आवश्यक बँक तपशील नमुद करणे आवश्यक आहे.

९) विकल्प नोंदविताना काही अडचणी उधबल्यास उमेदवारांनी ०७२९२००६३०५ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

वरीलप्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखून ठेवण्यात येतील.

डॉ.शितलकुमार जाधव

**सदस्य सचिव ,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकार**
**जिल्हा परिषद सोलापूर**

दिलीप स्वामी भाप्रसे

**सदस्य जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,सोलापूर**

मिलींद शंभरकर भाप्रसे

**अध्यक्ष,जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी**
**सोलापूर**